● गुरुवार, दि. ३१ ऑक्टोबर २०२४ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक ९८ वा ● किमंत २ रुपये ● पाने ४
8390098886 | yuva.aadarsh@gmail.com | 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ | https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ | https://twitter.com/Yuva_aadarshjln/ | RNI: MAHMAR/2019/78282

## विधानसभा निवडणूक प्रक्रिया निष्पक्षपणे आणि निर्भय वातावरणात पार पाडावी - वेद पती मिश्र

### केंद्रीय निवडणूक निरिक्षक यांनी घेतला विधानसभा निवडणूक पूर्वतयारीचा आढावा

**जालना । प्रतिनिधी -** विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर जालना जिल्हा प्रशासनाने निवडणूकीच्या अनुषंगाने चांगली पूर्वतयारी केलेली असुन, ही निवडणूक प्रक्रिया निष्पक्षपणे आणि निर्भय वातावरणात पार पाडण्यासाठी निवडणूक प्रक्रियेतील सर्व अधिकारी-कर्मचारी यांनी त्यांच्यावर सोपविण्यात आलेल्या जबाबदाऱ्या गांभिर्यपूर्वक पार पाडण्याचे निर्देश १०१-जालना, १०२-बदनापूर (अ.जा.) आणि १०३ भोकरदन विधानसभा मतदार संघाचे निवडणूक निरीक्षक (सामान्य) वेद पती मिश्र यांनी यावेळी दिले.

येथील जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल सभागृहात आयोजित विधानसभा निवडणूकीच्या पूर्वतयारीच्या आढावा बैठकीत श्री. मिश्र हे बोलत होते. यावेळी ९९-परतूर आणि १००-घनसावंगी विधानसभा मतदार संघाचे निवडणूक निरीक्षक (सामान्य) श्री. नवीन, निवडणूक निरीक्षक (पोलीस) झेड न विजया, निवडणूक निरीक्षक (खर्च) देव प्रकाश बमणावत जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, पोलीस अधिक्षक अजयकुमार



बन्सल, अपर जिल्हाधिकारी रिता मैत्रवार, अपर पोलीस अधिक्षक आयुष नोपाणी, बीएसएफचे अजयकुमार, निवासी उपजिल्हाधिकारी गणेश महाडिक, उप जिल्हा निवडणुक अधिकारी शशिकांत हदगल यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी श्री. मिश्र म्हणाले की, जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ आणि पोलीस अधिक्षक अजयकुमार बन्सल यांच्या टीमने विधानसभा निवडणूकीच्या अनुषंगाने सर्व प्रक्रीयेची पुर्वतयारी खुप चांगल्या प्रकारे तयारी केलेली आहे. परंतू आता या पुर्वतयारीची प्रत्यक्षात योग्य अंमलबजावणी करणे आवश्यक असून, त्यासाठी सर्वांनी योग्य नियोजन करत आपल्या जबाबदारी पार पाडाव्यात. आपण आता निवडणूकीच्या महत्वाच्या टप्प्यावर पोहचलो असून, सर्वांनी गांभिर्याने निवडणूकीचे काम करावे. सर्व निवडणूक अधिकाऱ्यांनी आपल्या अधिनस्त कर्मचाऱ्यांना निवडणूकीच्या अनुषंगाने चांगल्या प्रकारे प्रशिक्षित करावे. पोस्टल मतदानाचे योग्य नियोजन करावे. तसेच भारत पान २ वर

## रॅलीतील गर्दी 'लक्ष्मी'रुपी - गोरंटयाल



**जालना । प्रतिनिधी -** शक्ती प्रदर्शन करत महायुतीचे उमेदवार अर्जुनराव खोतकर यांनी मोठी रॅली काढली होती. या रॅलीतील गर्दीचे रुपांतर मतपेटीत होत नसल्याची टिका महाविकास आघाडीचे जालना विधानसभा मतदार संघाचे उमेदवार कैलास गोरंट्याल यांनी केली. ही गर्दी 'लक्ष्मी'रुपी असल्याचे ते म्हणाले.

जालना विधानसभा मतदार संघातून महायुतीचे उमेदवार अर्जुन खोतकर यांनी भव्य शक्तिप्रदर्शन करत आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीचे जालना विधानसभा मतदार संघातील उमेदवार आ. कैलास गोरंटयाल यांच्याशी उपस्थीत पत्रकारांनी संवाद साधला असता ते म्हणाले की, नवीन उमेदवार असल्यास ते शक्तिप्रदर्शन करतात. आम्ही तर मैदानात आहोत. शक्ती प्रदर्शनाची पद्धत आता बंद झाली असून रॅलीला झालेली गर्दी ही लक्ष्मी रूपाने झाली असल्याचे गोरंटयाल यांनी म्हंटले आहे. पक्षातील बंडखोरी बाबत विचारले असता ते म्हणाले की, या बाबत पक्षश्रेष्ठी योग्य तो निर्णय घेतील. येत्या दि. ४ नोव्हेंबर रोजी उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा शेवटचा दिवस असून या दिवशी जालना विधानसभा मतदार संघातील सर्व चित्र स्पष्ट होईल असा आशावाद व्यक्त करून त्यानंतर काय ते बघू असे देखील गोरंटयाल यांनी स्पष्ट केले. कुणी शक्ती प्रदर्शन करत गर्दी जमवल्याने काही होत नाही. लोकांचं आता ठरलं असून पाच वर्षे कुणी काय काम केले ही बाब लक्षात घेऊनच जनता पाठीशी उभी राहते. पक्षाचा एबी फॉर्म मला मिळाला असून लोकशाही असल्याने उमेदवारी मागण्याचा सर्वांना अधिकार असतो. त्यामुळे फॉर्म कुणीही भरू शकतो. त्यांना आपण थांबवू शकत नाही. जालना विधानसभा मतदार संघात झालेल्या बंडखोरी बाबत काँग्रेस पक्षाचे वरिष्ठ नेते निर्णय घेतील, असे पत्रकारांनी उपस्थीत केलेल्या प्रश्नाच्या उत्तरात गोरंट्याल यांनी स्पष्ट केले.

## डॉ. अंकिता ढाकणे मिस ताज इंडिया

**जालना । प्रतिनिधी -** पुणे येथे नुकत्याच पार पाडलेल्या ताज मिस ताज इंडिया इव्हेंट्समध्ये जालन्याची डॉ. अंकिता ढाकणे हीने ब्युटी विथ ब्रेन्स आणि ब्युटी पेजंट हा किताब पटकावला. डॉ.अंकिता या मुंबई कूपर हॉस्पिटलमध्ये एमडी फार्मकॉलॉजीचे शिक्षण घेत आहेत. ढाकणे हीने आपले शालेय शिक्षण जालन्याच्या सेंट मेरीज शाळेत पूर्ण केले असून वैद्यकीय शिक्षण त्या चीनमध्ये पुर्ण केले. वेळेचा सदुपयोग करत आपण काहीतरी वेगळे करून दाखवू म्हणत त्यांनी ह्या ब्युटी पेजंटमध्ये भाग घेतला होता. या ब्युटी पेजंटमध्ये मुंबई, कलकत्ता, कर्नाटक, ओरिसा, केरळ यासह अनेक ठिकाणच्या मुलींनी भाग घेतला होता, यातून डॉ. ढाकणे अग्रस्थानी राहिल्या. अतिशय कष्टाने त्यांनी हा प्रवास गाठला असून पुढे डॉक्टर बनून गोरगरिबांची सेवा करण्याचा मानस असल्याचे तिने सांगितले. या



यशाबद्दल आई-वडील शोभा सुनील ढाकणे, कुटूंबिय, मित्रपरिवाराकडून डॉ. अंकिताचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## अब्दुल हफीज यांना ग्रामीण भागातून पाठिंबा

**जालना । प्रतिनिधी** - जालना विधानसभा मतदारसंघातून अब्दुल हफीज यांनी काल सोमवारी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर त्यांना ग्रामीण भागातून वाढता पाठिंबा मिळत आहे.

जालना जिल्हा मराठी पत्रकार संघाचे माजी जिल्हाध्यक्ष अब्दुल हफीज यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आणि आज मंगळवारी (दि.३०) जालना तालुक्यातील देवमुर्ती, वाघ्रुळ, सिंधी काळेगाव, धारकल्याण येथील युवकांनी अब्दुल हफीज यांच्या निवासस्थानी येवून त्यांचा सत्कार केला आणि त्यांना पाठिंबा जाहीर करीत बहुमताने निवडून आणण्याचा निर्धार केला.

यावेळी सलीम शेख ,अमीन शेख,

शेख गयासोद्दीन, शेख शरिक, मंजूर शाह, सोहील शेख, शेख मोहसीन, फैसल पठाण, असिफ खान, अरबाज सय्यद, अस्लम शेख, वसीम शेख, शेख सगीर, सय्यद



कलीम, सय्यद तय्यब, शेख जुबेर, शेख अजीम, मोसीन शेख, तौसिफ खान, शेख सैफ, शेख समीर, इकबाल शाह, मन्सूर, आरण शेख, शेख अस्लम, मन्सूर, समीर, अस्लम भाई, युनुस भाई, आसेफ पठाण, अमिरभाई, शाहेद शेख, सद्दाम खान, नियाज सेठ,मुख्तार पठाण यांच्यासह असंख्य युवकांची उपस्थिती होती.

### युवा आदर्श
### नरक चतुर्दशी ...

नरक चतुर्दशी दिनी
मारला तो नरकासुर
राक्षसी बंदिवासातून
मुक्त कन्या बेकसूर
भार्या सन्मान लाभला
क्षणैक विरली हुरहूर
रे मलीन हरि विलीन
मिटले संशयी काहूर
दिवाळी पहाट रंगली
जुळून आले ते सूर
दिवाळी सण सर्वांचा
आनंदने दाटला ऊर
सुस्वागत प्रकाशाचे
नगरी अवघी आतूर
नको कुणाला दुःख
नको कुणी चिंतातुर
अभ्यंग स्नान पहाटे
सुचिर्भूत हो अंत:पुर
अंतर्बाह्य स्वच्छ होऊ
अवगुण सारूया दूर
तमसोमाज्योतिर्गमय्
सोज्वळ चांदणे टिपूर
सुख समृध्दी येई घरा
छुन छुन वाजत नुपूर
सणामागचा सार्थअर्थ
समजूनि घ्यावा पुरेपूर
धर्म आणि संस्कृतीचा
शास्त्राशी मेळ भरपूर

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

टेंभुर्णीकरांकडे ग्रामपंचायतचा

## कोटींचा कर थकीत

### कर भरण्याचे सरपंच सुमन म्हस्के यांचे आवाहन



**दत्ता देशमुख**

**टेंभुर्णी -** टेंभुर्णीकरांकडे ग्राम पंचायतची तब्बल एक कोटी रुपयांची कर वसुली थकली आहे. दरम्यान वेळोवेळी आवाहन करूनही ग्रामस्थांकडून कर भरण्यासाठी पाहिजेत असा प्रतिसाद मिळत नाही.

सध्या दिवाळीच्या मुहूर्तावर ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांकडून घरोघरी हिंडून कर वसुली केली जात आहे. त्यासही अत्यल्प प्रतिसाद मिळत असल्याचे कार्यालयीन अधीक्षक विक्रम उकांडे यांनी सांगितले. ग्राम पंचायतीकडून ग्रामस्थांवर घरपट्टी, नळपट्टी, दिवाबत्ती, साफसफाई इत्यादी कर आकारला जातो. हा कर प्रत्येक कुटुंबाला दरवर्षी भरणे बंधनकारक असतानाही अनेक जण कर भरण्यासाठी मुद्दामून टाळाटाळ करीत असतात. यामुळे ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या पगारांसह साफसफाई व इतर सुविधा देताना ग्रामपंचायतीला मोठ्या आर्थिक अडचणीचा सामना करावा लागत आहे.

सध्या दिवाळी जवळ येताच ग्रामपंचायतीकडून घरोघरी हिंडून कर वसुली केली जात आहे. यासाठी ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे पथक दररोज गावात फेरी काढून ग्रामस्थांना तर वसुलीचे आवाहन करीत आहे.

यामध्ये विक्रम उकांडे, अब्दुल अजीस, डिगांबर भिसे, बाबुराव साबळे, रामदास धनवई, अनिल गायकवाड, शंकर अढावे, सुनिल भाले योगेश गायमुखे आदींचे पथक वसुलीसाठी सेवा देत आहे.


ग्रामस्थांना कर वसुली बाबत वेळोवेळी ग्रामपंचायत तर्फे आवाहन केले जात आहे. काही कुटुंब सातत्याने नियमित कर भरणा करतात परंतु बहुतांश लोकांकडे थकबाकी रखडली आहे. यामुळे कर्मचाऱ्यांच्या पगारासह साफसफाई व इतर सुविधा देताना प्रशासनासमोर प्रश्न निर्माण होत आहे. ग्रामस्थांनी नियमित पान २ वर

वर्ष 8 वे

एक हात मदतीचा

दिवाळी आली म्हणजे दिवाळी फराळ, मिठाई, कपडे तसेच नवीन काहीतरी वस्तू प्रत्येक घरामध्ये असते.. परंतु समाजामध्ये असे काही लोक आहेत ज्यांना दोन वेळचे जेवण मिळणे मोठ्या जिकरीचे काम असते व ते पोट भर मिळेल याची ही शाश्वती नसते.. अशाच बेघर,वृध्द,दिव्यांग,लहान बालके यांच्या साठी मागील 7 वर्षापासून दिवाळी उपक्रम अंतर्गत दिवाळी फराळ व नवीन कपडे वाटप करत असतो... या ही वर्षी अती गरजू लोकांना दिवाळी फराळ व नवीन कपडे वाटप करणार आहोत. या पवित्र्य कार्यास पाझर ला 300,500,1000 किंवा शक्य ती मदत आपण करु शकता...

चला..! आपल्या परिवारासोबत बेघर, वंचितांची दिवाळी गोड करूया...



ISO 9001 2015 प्रमाणित संस्था
पाझर सेवाभावी संस्था,जालना
Bank :- Bank of Badoda A/c no.66810200000164
IFSC code:- BARB0VJJALN (Ifsc code मध्ये BARB नंतर झीरो आहे)
रजि.नं F-012790(JLN)
मो.9922299090

टीप:- आपल्या कडे जुने कपडे,साडी असतील तर,
ते ही स्वीकारले जाईल ते धुवून प्रेस करून द्यावे तसेच फाटलेले नसावे..

9604334400

## संपादकीय पान

# लोहपुरुष..!

भारताचे पहिले उपपंतप्रधान, पहिले गृहमंत्री, लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांची आज जयंती. सरदार वल्लभभाई पटेल यांचा जन्म ३१ ऑक्टोबर १८७५ रोजी आणंद या छोट्याशा गावात झाला. त्यांचे वडील झव्हेरिभाई यांनी १८५७ च्या स्वातंत्र्य लढ्यात भाग घेतला होता. त्यामुळे लहानपणीच त्यांना देशभक्तीचे बाळकडू मिळाले. त्यांच्या संपुर्ण कुटुंबावर स्वातंत्र्य चळवळीचा प्रभाव होता. सरदार पटेल हे हुशार विद्यार्थी होते. त्यांनी वकिलीचे शिक्षण पूर्ण करून बोरसाड येथे वकिली सुरू केली. एक अभ्यासू वकील म्हणून त्यांचे नाव सर्वदूर पोहचले पुढे ते बॅरिस्टर झाले. बॅरिस्टर झाल्यावर अहमदाबाद येथे त्यांनी वकिली सुरू केली. अल्पावधीतच एक निष्णात वकील म्हणून त्यांची कीर्ती देशभर पसरली. विकिलीसोबत त्यांना राजकारणाचीही आवड होती त्यामुळे त्यांनी अहमदाबाद पालिकेची निवडणूक लढवली त्यांनी ती निवडणूक सहज जिंकली. राजकारणात आल्यावर त्यांना जनतेचे मूलभूत प्रश्न समजू लागले. १९१७ साली खेडा जिल्ह्यात प्रचंड पाऊस झाला त्यामुळे खरिपाचे पीक वाया गेले. पुढे उंदराचा सुळसुळाट आणि किटकांमुळे रब्बीचे पीकही गेले त्यामुळे शेतकरी हवालदिल झाले. त्यातच दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाल्याने शेतकऱ्यांच्या हाती २५ टक्क्यांपेक्षाही कमी उत्पादन येईल अशी परिस्थिती निर्माण झाली. नैसर्गिक आपत्तीमुळे हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांना शेतसाऱ्यात सूट मिळावी, शेतसाऱ्याची वसुली पुढे ढकलावी यासाठी त्यांनी १८ हजार शेतकऱ्यांच्या सह्या असलेले निवेदन सरकारकडे दिले पण सरकारने त्याची दखल न घेता शेतसारा वसुलीसाठी शेतकऱ्यांवर जप्तीचे आदेश दिले त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये असंतोष निर्माण झाला. महात्मा गांधी यांनी सक्तीच्या शेतसारा वसुली विरोधात खेडा येथे सत्याग्रह चळवळ सुरू केली. या चळवळीचे नेतृत्व त्यांनी सरदार पटेल यांच्याकडे सोपवले. शेतकऱ्यांचे हे आंदोलन त्यांनी अत्यंत निर्धाराने यशस्वी केले. या आंदोलनात त्यांनी केलेल्या नेतृत्वाने महात्मा गांधी भारावून गेले. पुढे महात्मा गांधी यांच्या प्रत्येक चळवळीत त्यांनी हिरीरीने भाग घेतला. नेतृत्वाप्रमाणेच त्यांचे वक्तृत्वही प्रभावी होते. आपल्या वक्तृत्वाने जनसामान्यांना प्रभावित करणाऱ्या सरदार पटेलांनी १९२८ साली सायमन कमिशन विरोधात पुकारलेल्या बारडोली सत्याग्रहादरम्यान लोकांना आपल्या महान विचारांनी प्रभावित केले त्यामुळे इंग्रजांनी अवाजवी वाढवलेल्या करांना न भरण्यावर जनता सहमत झाली त्यामुळे ब्रिटिश व्हाइसरॉयला पराभव पत्करावा लागला. या आंदोलनात आपल्या सशक्त नेतृत्वाने वल्लभभाई पटेल जनतेत चांगलेच प्रसिद्ध झाले आणि बारडोलीतील लोक त्यांना सरदार म्हणू लागले त्यामुळे त्यांच्या नावापुढे सरदार जोडले जाऊ लागले. १९३० साली सविनय कायदेभंग चळवळीत भाग घेतला म्हणून त्यांना इंग्रजांनी अटक केली. त्यांना पाच वर्षांचा तुरुंगवास भोगावा लागला. १९४२ च्या चले जाव आंदोलनातही त्यांनी भाग घेतला त्यावेळीही त्यांना अटक झाली. १९४६ झाली स्थापन झालेल्या हंगामी सरकारमध्ये ते गृहमंत्री होते. गृहमंत्री या नात्याने त्यांनी भारत पाक फाळणीच्या चर्चेमध्ये निर्णायक भूमिका बजावली. देश स्वातंत्र्य झाल्यानंतर पंडित नेहरूंच्या नेतृत्वाखालील मंत्रिमंडळात ते उपपंतप्रधान बनले. त्यांच्याकडे गृहखाते, माहिती आणि नभोवाणी, संस्थांनचा प्रश्न व निर्वासितांचा प्रश्न व निर्वासितांचे प्रश्न सारखे महत्वाचे खाते देण्यात आले. स्वातंत्र्य भारताचे गृहमंत्री झाल्यावर सरदार पटेल यांनी सर्वात आधी भारतातील वेगवेगळ्या संस्थानातील राजांना आपल्या दूरदर्शीपणाचा आणि बुद्धिमत्तेचा वापर करून भारतात विलीन होण्याची सूचना केली. बहुतांश संस्थानांनी याला सहमती दर्शवून भारतात विलीन झाले पण जुनागड, हैदराबादचा निजाम, जम्मू काश्मीर च्या राजांनी भारतात विलीन होण्यास नकार दिला. सरदार पटेलांनी आपल्या कुशाग्र बुद्धिमत्तेच्या बळावर सैन्याचा वापर करीत या तिन्ही संस्थानांना भारतात विलीन केले. सरदार पटेल यांनी तत्कालीन ५६५ संस्थाने भारतात विलीन करून एकसंध भारत निर्माण केला त्यांची ही कामगिरी ऐतिहासिक अशीच होती. त्यांच्या याच कामगिरीने त्यांना लोहपुरुष ही पदवी देण्यात आली. १९५० साली त्यांचे स्वास्थ्य बिघडू लागले. २ नोव्हेंबर १९५० ला त्यांचे स्वास्थ्य इतके बिघडले की ते अंथरुणावरुन उठण्यास देखील असमर्थ होते. पुढे १५ डिसेंबर १९५० रोजी हृदय विकाराच्या तीव्र झटक्याने त्यांची प्राणज्योत मालवली. सरदार पटेल यांना विनम्र अभिवादन!



**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# आदर्श दिवाळी


'तमसो मा ज्योतिर्गमय' या श्लोकाचा अर्थ : 'हे भगवंता ! आपण मला असत्याकडून सत्याकडे,अंधकारातून प्रकाशाकडे न्यावे 'अशी प्रार्थना आहे.प्रत्येक प्राणिमात्रांची धडपड प्रकाशाकडे जाण्याची असते. ज्या स्थितीत आहोत त्याच्या पुढील स्थितीत जाण्यासाठी, प्रगती करण्याकडे असते. अर्थात नकारात्मकते कडून सकारात्मकतेकडे जायचे असते. जीवनात सकारात्मकता शिकवणारा, प्रकाशाकडे वाटचाल करण्यास शिकवणारा सण म्हणजे दिवाळी.

सत्याच्या विजयाचे प्रतिक ! - प्रभू श्रीरामचंद्र हे १४ वर्षाचा वनवास पूर्ण करून दिवाळीच्या दिवशी अयोध्येत परत आले. प्रभू श्रीरामचंद्राच्या आगमनाने प्रजेला खूप आनंद झाला. त्यांच्या स्वागतासाठी संपूर्ण अयोध्या नगरीत घरोघरी तुपाचे दिवे लावून आनंद व्यक्त करण्यात आला. प्रभू श्रीराम सत्याचे मूर्तिमंत रूप असल्याने त्यांचा विजय म्हणजे सत्याचाच विजय होता. या विजयाचा उत्सव म्हणून आपण दिवाळी दीपोत्सव, प्रकाशोत्सव म्हणून साजरी करतो.

सकारात्मकता वाढविणारा सण ! - दिवाळी जवळ येताच घर, दुकाने, आस्थापने, आपल्या आजूबाजूचा परिसर,शहर यांची स्वच्छता सुरू होते. जाळे जळमटे काढून रंगरंगोटी केली जाते. तुटक्या फुटक्या साहित्याची डागडुजी होते. त्यामुळे स्वच्छता आणि नीटनेटकेपणा यांसोबतच वातावरणातील सकारात्मकता वाढते. त्याचा प्रत्येक जिवाच्या मन आणि बुध्दीवर सकारात्मक परिणाम होतो. मनातील नकारात्मकता दूर होऊन आपल्याला आनंद प्राप्त होतो.

गुणवृद्धीसाठी लक्ष्मीपूजन ! - लक्ष्मीपूजन हे अश्विन अमावस्येला संध्याकाळी करतात. तसेच रात्री बारा वाजता अलक्ष्मी निःसारण करतात. शास्त्रानुसार लक्ष्मीपूजनामुळे पूजाकरणाऱ्याला लक्ष्मी तत्वाचा लाभ होतो. तो टिकवून ठेवण्यासाठी धर्माचरण करणे आवश्यक आहे. अधर्माची कास धरली किंवा कर्तेपणा निर्माण झाला तर आपण स्थिर राहू शकत नाही. लक्ष्मी चंचल आहे ! असे म्हणतात, पण खरेच लक्ष्मी चंचल आहे का ? याचे उत्तर नाही असे आहे. ती नेहमीच भगवंताच्या अनुसंधानात स्थिर असते. जेथे अनुसंधान असते, जिथे धर्माचरण असते तिथे लक्ष्मी विराजमान होते. ऐश्वर्य, सौंदर्य, शांती, सत्य, समृद्धी आणि संपत्ती याची अधिष्ठात्री देवी श्री लक्ष्मी कमलासनावर विराजमान होऊन समुद्रमंथनातून आली. अशा या लक्ष्मीचे वर्षातून केवळ एकदा पूजन करून ती प्रसन्न होईल का ? तिला प्रसन्न ठेवायचे असेल तर कमळ ज्या प्रमाणे चिखलातून बाहेर येते त्या प्रमाणे स्वभाव दोषांचा चिखल दूर सारून धर्माचरण करायला हवे. असे धर्माचरण करीत ईश्वराच्या अनुसंधानात रममाण झाल्यास श्री लक्ष्मी हृदयकमळावर निश्चितच विराजमान होईल. तसेच धन धान्याच्या रूपात आपल्याजवळ स्थिर होईल. आपल्यातील दुर्गुण घालविण्यासाठी प्रयत्न करणे महत्वाचे आहे, तेच खऱ्या अर्थाने अलक्ष्मी निःसारण होय.

सांप्रत काळातील दिवाळीचे बदलते स्वरूप ! - समृद्धीकडे, आनंदाकडे, प्रकाशाकडे नेणारी दिवाळी आहे. परंतु, सद्य परिस्थिती बघता दिवाळी म्हणजे देवता, थोरपुरूष यांची चित्रे असणाऱ्या फटाक्याची आतशबाजी, चित्रपटातील गाण्यांनी रंगणारी दिवाळी पहाट, डोळ्यांना त्रासदायक आणि घातक ठरणाऱ्या चिनी दीपमाळा आणि आकाशदिवे यांचा झगमगाट या सगळ्यामुळे दिवाळीचे संपूर्ण स्वरूप बदलून गेले आहे. यामुळे नकारात्मकता वाढते आहे. ज्या लक्ष्मीची घरात पूजा करतो तिचेच फोटो असलेले फटाके



फोडून आपण चिंध्या करतो. हे योग्य आहे का ? अश्याने ती प्रसन्न होईल का ? घरात केलेल्या पूजेचा काही परिणाम न होता यातून देवतांचे विडंबन होणार आहे. या विडंबनातून होणारे पातक जर आपल्या कृतीतून घडत असेल तर ती पूजा फलित होईल का ? त्याचप्रमाणे अश्या चुकीच्या कृतीमुळे युवा पिढी समोर आपण काय आदर्श ठेवणार ? याचा विचार करायला हवा. स्वदेशी आणि पारंपरिक सहित्यापेक्षा झगमगाट आणि इन्स्टंटकडे कल वाढतो आहे.हि परिस्थिती बदलायला हवी त्यामुळे आपल्याला दिवाळीचा खरा आनंद मिळू शकेल.

आदर्श दिवाळी साजरी करण्याचे ध्येय घेऊया ! - देवता, थोरपुरूष यांच्या फटाक्यांची विक्री होत असल्यास हिंदूंनी एकत्र येऊन त्या विषयी प्रबोधन करायला हवे. आपल्या संपर्कात येणाऱ्या बाल आणि युवकांचे प्रबोधन करायला हवे. दिवाळी पहाट मधे होणाऱ्या अशास्त्रीय आणि अश्लील गाण्यांच्या ऐवजी भावभक्ती तसेच देशप्रेम निर्माण करणाऱ्या गाण्यांसाठी आग्रह धरायला हवा.भावी पिढीचा कौशल्य विकास व्हावा, त्यांच्यात हिंदूधर्म - राष्ट्र - संस्कृती विषयी प्रेम आणि कृतज्ञता भाव निर्माण व्हावा यासाठी रांगोळी स्पर्धा, किल्ले स्पर्धा, परिसर स्वच्छता आणि सजावट स्पर्धा घ्यायला हव्या.शरीर आणि पर्यावरणावर घातक परिणाम करणारे विदेशी आणि चिनी उत्पादने न घेता स्वदेशी आणि हलाल मुक्त उत्पादने घेऊया. त्या विषयी स्वतः जागरूक राहून कृती करुन इतरांनाही जागृत करायला हवे. अशी आदर्श दिवाळीच आपल्याला ' मृत्योर्मा अमृतं गमय'

अर्थ : मृत्यूपासून जीवनाकडे वाटचाल करायला शिकवते. त्यातूनच आपले जीवन अमृता समान आनंदी होत असते.

आपल्या कुलदेतेचे स्मरण करून तिला प्रार्थना करूया,

'हे भगवंता! आपणच आमच्या कडून आदर्श दिवाळी यंदाच्या वर्षी पासून साजरी करवून घ्या. आमच्या वैयक्तिक उन्नती सोबतच राष्ट्र - धर्म यांच्या रक्षणासाठी आणि उन्नतीसाठी आमच्याकडून धर्माचरण करून घ्या हीच प्रार्थना आहे.'

**संकलन- दत्तात्रेय वाघूळदे, सनातन संस्था**
**संपर्क- ९२८४०२७१८०**

# वसंतोत्सवाचा प्रारंभ; अभ्यंगस्नान, का-कधी-कसे!

गुढीपाडवा, दिवाळी इत्यादी सणांना 'अभ्यंगस्नान' करावे असे धर्मशास्त्रात सांगितले आहे. या लेखात आपण 'अभ्यंगस्नान' म्हणजे काय, त्याची प्रत्यक्ष कृती, त्याने होणारे लाभ, अभ्यंगस्नानात तेल लावण्याचे महत्त्व सनातन संस्थेद्वारा संकलित केलेल्या या लेखातून पहाणार आहोत.

अभ्यंगस्नान : अर्थ

अभ्यंगस्नान म्हणजे पहाटे उठून डोक्याला आणि शरिराला तेल लावून नंतर कोमट पाण्याने स्नान करणे

शरीराला तेल लावून चोळून ते त्वचेत जिरविणे आणि नंतर ऊन (गरम) पाण्याने स्नान करणे म्हणजे अभ्यंगस्नान.

पिंडाच्या अभ्युदयासाठी केलेले स्नान म्हणजेच अभ्यंगस्नान- वर्षभरात अभ्यंगस्नान करण्याचे दिवस

संवत्सरारंभ- वसंतोत्सवाचा प्रारंभ दिवस म्हणजे फाल्गुन कृष्ण प्रतिपदा

दिवाळीचे तीन दिवस म्हणजे आश्विन कृष्ण चतुर्दशी अर्थात नरक चतुर्दशी, आश्विन अमावास्या आणि कार्तिक शुद्ध प्रतिपदा.

अभ्यंगस्नानात तेल लावण्याचे महत्त्व

अभ्यंगाने, म्हणजेच स्नानापूर्वी तेल लावण्याने पिंडातील चेतनेतील प्रवाहाला अभंगत्व, म्हणजेच अखंडत्व प्राप्त होते. स्नानापूर्वी देहाला तेल लावल्याने पेशी, स्नायू आणि देहातील पोकळ्या जागृत अवस्थेत येऊन पंचप्राणांना कार्यरत करतात. पंचप्राणांच्या जागृततेमुळे देहातील टाकाऊ वायू ढेकरा, जांभया इत्यादींद्वारे बाहेर पडतात. यामुळे देहातील पेशी, स्नायू आणि अंतर्गत पोकळ्या चैतन्य ग्रहण करण्यात संवेदनशील बनतात. हा टाकाऊ वायू किंवा देहात घनीभूत झालेली उष्ण टाकाऊ ऊर्जा कधी कधी लहरींच्या रूपात डोळे, नाक, कान आणि त्वचेची रंध्रे यांतून बाहेर पडते; म्हणून तेल लावून झाल्यावर कधी कधी डोळे आणि मुख (चेहरा) लाल होतो.'

अभ्यंगस्नान केल्याने होणारे लाभ

अभ्यंगस्नानामुळे होणारे शारीरिक लाभ : त्वचेला नेहमी स्निग्धता असावी लागते, म्हणून तेल लावतात. ऊन पाणी हे मंगल आणि शरीराला सुखदायक आहे; म्हणून ऊन पाण्याने स्नान करतात. तेल लावून नंतर स्नान करण्याने त्वचेला आणि केसांना आवश्यक तेवढाच ओशटपणा रहातो; म्हणून स्नानापूर्वी तेल लावणे आवश्यक आहे. स्नानानंतर तेल लावणे उचित नाही.

अभ्यंगस्नानामुळे होणारे आध्यात्मिक लाभ : स्नानामुळे रज-तम गुण एक लक्षांश इतके कमी होऊन सत्त्वगुण त्याच प्रमाणात वाढतात आणि त्यांचा प्रभाव नेहमीच्या स्नानामुळे सुमारे तीन तास टिकतो, तर अभ्यंगस्नानामुळे चार ते पाच तास टिकतो. अभ्यंगस्नानाचे अन्यही बरेच आध्यात्मिक लाभ आहेत.

अभ्यंगस्नानाची कृती

तेल, उटणे आणि त्यांचे मिश्रण

व्यक्तीला प्रथम कुंकवाचा टिळा लावण्यात येतो. तिच्या अंगाला शरिराच्या वरच्या भागाकडून खालच्या भागाकडे तेल लावण्यात येते. नंतर तेल आणि उटणे यांचे मिश्रण एकत्रित करून अंगाला लावण्यात येते. मग तिला ओवाळण्यात येते. त्यानंतर तिने दोन तांबे उष्ण पाणी अंगावर घेतल्यावर तिच्यावरून आघाडा किंवा टाकळा यांची फांदी मंत्र म्हणत तीनदा फिरवतात.

दिवाळीत अंगाला उटणे लावण्याची पद्धत

दिवाळीतील अभ्यंगस्नानात उटण्याला विशेष महत्त्व आहे. उटणे अंगाला लावण्याची पद्धत कशी असावी, याचे विश्लेषण येथे देत आहोत. उटणे हे रजोगुणी तेजोमय असल्याने ते अंगाला लावतांना घड्याळाच्या काट्याच्या दिशेने बोटांच्या अग्रभागाचा अंगाला स्पर्श करून थोडेसे दाबून लावावे. प्रत्येक ठिकाणी दिलेली उटणे लावण्याची पद्धत त्या त्या पोकळीत असणार्या त्रासदायक वायूंच्या गतीला अनुसरून दिली आहे.

स्वतःला उटणे लावणे

कपाळ : कपाळावर लावतांना मधल्या तीन बोटांचा उपयोग करून स्वतः लावतांना डावीकडून उजवीकडे या पद्धतीने लावावे.

कपाळाच्या दोन्ही टोकांना बाजूला भुवईजवळ : येथे लावतांना ते बोटांच्या अग्रभागांनी डावीकडून उजवीकडे (खालून वरच्या दिशेने), तसेच उजवीकडून डावीकडे (वरून खालच्या दिशेने) चोळून लावावे.

डोळ्यांच्या पापण्या : यांवर लावतांना नाकाकडून कानाकडे हात फिरवावा.

नाक : याला लावतांना उजव्या हाताच्या अंगठा आणि तर्जनी यांनी नाकाच्या दोन्ही बाजूंनी खालच्या दिशेने उतरत यावे अन् खाली आल्यावर उटण्याचा वास घ्यावा. उटण्याच्या वासातून प्रक्षेपित होणारा तेजाशी संबंधित गंध फुफ्फुसांतील वायूकोषात गेल्याने तेथील काळे आवरण नष्ट होण्यास साहाय्य होते.

मुखाचा वरचा भाग : या भागातून, म्हणजेच नाकाच्या खालून मधली तीन बोटे ठेवून आरंभ करून घड्याळाच्या काट्याच्या दिशेने मुखाभोवती गोल, म्हणजेच हनुवटीच्या खड्ड्यातून वर स्वतः च्या डावीकडे जाऊन मुखाभोवतीचा गोल पूर्ण करावा.

गालांच्या पोकळी : गालाच्या मध्यभागातून आरंभ करून घड्याळाच्या काट्याप्रमाणे बोटांची अग्रे गोल गोल फिरवून लावावे.

कानाची पाळी : ही तर्जनी आणि अंगठा यांमध्ये धरून तिथल्या तिथे हलवून उटणे लावावे.

दोन्ही कान : दोन्ही कान हातांनी पकडून कानाच्या मागच्या बाजूला फक्त अंगठा ठेवून खालून वरच्या दिशेने फिरवावा.

मान : मानेच्या मागून मध्यातून दोन्ही हातांची बोटे पुढे विशुद्ध चक्राकडे आणणे

छाती आणि पोट यांचा मध्यभाग : उजव्या हाताच्या तळव्याने छातीच्या मध्यरेषेवर वरून खालच्या दिशेने नाभीकडे हात फिरवत आणणे.

काखेपासून कमरेपर्यंत : काखेपासून पितृतीर्थासारखा हात, म्हणजेच अंगठा एका बाजूला अन् चार बोटे दुसर्याम बाजूला ठेवून अंगाच्या दोन्ही बाजूच्या रेषेवरून वरून खाली या पद्धतीने फिरवावेत.

पाय आणि हात : हाताची बोटे फिरवत पायांवर आणि हातांवर वरून खालच्या दिशेने उटणे लावावे.

पावलाच्या आणि पायाच्या जोडरेषा : पावलाच्या आणि पायाच्या जोडरेषेवर अंगठा अन् तर्जनी यांनी विळखा घालून तो भाग कड्यासारखा घासावा.

डोक्याच्या मध्यभागी : डोक्याच्या मध्यभागी तेल लावून ते हाताने घड्याळाच्या काट्याप्रमाणे फिरवावे.

दुसऱ्या व्यक्तीला उटणे लावणे

पाठ : दुसऱ्या व्यक्तीच्या पाठीला उटणे लावतांना पाठीच्या मणक्याच्या रेषेशी दोन्ही हातांच्या बोटांची अग्रे येतील अशा पद्धतीने वरून खालच्या दिशेने दोन्ही हात एकाच वेळी फिरवावेत.

कंबर : दुसर्या व्यक्तीला लावतांना कमरेच्या आडव्या रेषेवर पाठीकडून तिच्या डाव्या बाजूकडून उजवीकडे येऊन परत उजवीकडून डावीकडे जावे. असे परत परत लावावे.

देशकालकथन

अभ्यंगस्नान करतांना देशकालकथन करावे लागते.

देशकालकथनाचे महत्त्व

ब्रह्मदेवाचा जन्म झाल्यापासून आतापर्यंत ब्रह्मदेवाची किती वर्षे झाली; कोणत्या वर्षातील कोणते आणि कितवे मन्वंतर चालू आहे; या मन्वंतरातील कितवे महायुग आणि त्या महायुगातील कोणते उपयुग चालू आहे, या सर्वांचा उल्लेख देशकालकथनात असतो. यावरून यापूर्वी केवढा मोठा काळ गेला आहे आणि राहिलेला काळही केवढा मोठा आहे, याची कल्पना येते. 'आपण फार मोठे आहोत', असे प्रत्येकाला वाटत असते; पण 'आपण किती लहान तथा सूक्ष्म आहोत', याची कल्पना या विश्वाच्या अफाट काळावरून येते. यामुळे माणसाचा गर्व नाहीसा होतो.'

**संदर्भ : सनातन संस्थेचे ग्रंथ 'सण, धार्मिक उत्सव आणि व्रते' आणि 'दिनचर्येशी संबंधित आचार आणि त्यांमागील शास्त्र'**

**संकलन- श्री. दत्तात्रेय वाघूळदे, सनातन संस्था**
**संपर्क- ९२८४०२७१८०**

## पान १ वरुन

### विधानसभा निवडणुक ...

निवडणूक आयोगाने जारी केलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार प्रत्येक मतदान केंद्रावर मूलभूत सुविधा उपलब्ध असणे बंधनकारक आहे. यात ज्येष्ठ आणि दिव्यांग मतदारांसाठी रॅम्प, व्हिलचेअर, मतदारांचे उन्हापासून संरक्षणासाठी शेडची व्यवस्था, वैद्यकीय उपचार किट, मदत कक्ष, पिण्याचे पाणी, प्रसाधन गृह, आदीं सुविधा निवडणूक निर्णय अधिकारी यांनी आपल्या मतदार संघात आहेत का ? याची खात्री करुन घ्यावी. प्रामुख्याने ग्रामीण भागातील मतदान केंद्रावर आवश्यक सोयी-सुविधा आहेत का ? ज्या क्रिटीकल मतदान केंद्रावरुन वेबकास्टींग होणार आहे तेथील इंटरनेट सुविधा सुरळीत राहील याची काळजी घ्यावी. तसेच दूरस्थसह इतर सर्व मतदान केंद्राच्या मार्गाची आणि संपर्क व्यवस्थेची देखील तपासणी करुन ठेवावी. ज्याठिकाणी त्रुटी आहेत त्यासुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने तात्काळ कार्यवाही करण्याचे आदेश संबंधीत यंत्रणेला निवडणूक निरिक्षक (सामान्य) श्री. मिश्र यांनी यावेळी दिले.

निवडणूक कालावधीत मतदार संघात प्रसारीत होणाऱ्या राजकीय पेड न्यूज आणि राजकीय पुर्वप्रमाणिकरण न केलेल्या जाहिराती, तसेच सोशल मिडीयावरील जाहिरातीवर माध्यम प्रमाणीकरण व सनियंत्रण समितीने (एमसीएमसी) लक्ष ठेवावे. तसेच संशयीत पेड न्युज किंवा जाहिराती प्रसारित झाल्यास संबंधीत उमेदवारास खुलासा करण्याची नोटीस देण्यात यावी. तसेच एफएसटी, एसएसटी, व्हीएसटी आणि व्हिव्हिटी भरारी पथकांनी वेळोवेळी आपली स्थाने बदलून तपासणी करावी. निवडणूकीसाठी नियुक्त केलेल्या सर्व पथकांनी निवडणूक प्रक्रिया निष्पक्षपणे पार पाडावयाची आहे. मतदारांमध्ये जनजागृती करत, मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करण्याच्या सुचना ही श्री. मिश्र यांनी यावेळी दिल्या.

श्री. नविन यावेळी म्हणाले की, विधानसभा मतदारसंघातील निवडणुकांसाठी सर्व यंत्रणांनी निवडणूक प्रक्रिया शांततेत व नि:पक्षपातीपणे पार पाडण्यासाठी आपल्यावर सोपविण्यात आलेली जबाबदारी गांभिर्यपूर्वक पार पाडावी. विधानसभा मतदारसंघातील संवेदनशील मतदान केंद्रांवर विशेष लक्ष केंद्रीत करुन कायदा व सुव्यवस्थेबाबत योग्य ती खबरदारी घ्यावी. आदर्श आचारसंहितेचा भंग होणार नाही याची गांभीर्याने काळजी घ्यावी. यावेळी निवडणूक निरीक्षक (पोलीस) झेडन विजया म्हणाल्या की, निवडणुकीच्या अनुषंगाने पोलीस विभागाने तयारी पुर्ण केली आहे. परंतु जे नियोजन केले आहे, त्यानुसार कायदा सुव्यवस्था राखण्याची योग्य अंमलबजावणी करावी. तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी यांनी निवडणुक प्रक्रियेमध्ये व्यत्यय आणणाऱ्या व्यक्तींचा शोध घेवून त्यांच्यावर योग्य ती कारवाई करावी. निवडणुकीच्या प्रचाराला आता मोठ्या प्रमाणात सुरुवात होणार असल्याने विनापरवाना प्रचार करणाऱ्या वाहनांवर नियमानुसार कारवाई करावी. निवडणूक खर्च निरीक्षक श्री. बमणावत यांनी खर्च पथकांनी विविध माध्यमातून होणाऱ्या बेकायदेशीर सर्व बाबींची दैनंदिन नोंद ठेवून बारीक लक्ष ठेवावे. निवडणूक कालावधीत अर्थिक व मद्याचा गैरव्यवहार होण्याची शक्यता असल्याने मतदारसंघातील वाहनांची कसून तपासणी करावी, तसेच अशी वाहने आढळल्यास त्यांच्यावर कडक कारवाई करावी. उमेदवारांना ४० लाखांची खर्चाची मर्यादा ठेवण्यात आली आहे, त्यावर देखील खर्च पथकाने दैनंदिन लक्ष ठेवावे, निवडणूक कालावधीत जिल्ह्यात होत असलेली मद्य विक्रीवर देखील बारकाईने लक्ष ठेवावे. एफएसटी, एसएसटी, व्हीएसटी आणि व्हिव्हिटी भरारी पथकांनी गांभिर्याने तपासणी करण्याचे निर्देश ही श्री. बमणावत यांनी यावेळी दिले.

प्रारंभी विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ पार्श्वभूमीवर जिल्हा माहिती कार्यालय, जालना यांच्यामार्फत तयार करण्यात आलेल्या जालना जिल्हा विधानसभा मतदार संघ निवडणूक-२०२४ पूर्वपिठीकेचे केंद्रीय निवडणूक निरीक्षक यांच्या हस्ते आज प्रकाशन करण्यात आले. तसेच निवडणूक दिव्यांग आयकॉन डॉ. निलेश मदारे यांनी मतदान जनजागृतीबाबत आपले मनोगत व्यक्त केले. जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या पूर्वतयारीचे तर पोलीस अधिक्षक अजयकुमार बन्सल यांनी कायदा सुव्यस्थेच्या तयारीची सादरीकरणाद्वारे सविस्तर माहिती सादर केली. यावेळी बैठकीस सर्व निवडणूक निर्णय अधिकारी, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी, नोडल अधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्यासह संबंधीत विभाग प्रमुखांची उपस्थिती होती.

### कोटींचा कर ...

कर भरणा करून ग्रामपंचायतीला सहकार्य करावे, असे आवाहन सरपंच सुमन म्हस्के यांनी केले आहे.

कर वसुलीसाठी ग्रामपंचायतीकडून सातत्याने प्रयत्न केले जात आहे. तरीही मोठ्या प्रमाणावर कर थकबाकी आहे. याबाबत ग्रामस्थांना वेळोवेळी आवाहन केले जात आहे. सध्या कर वसुली पथक तैनात करून त्यांच्या मार्फत हर घर... कर वसुली हे अभियान राबविले जात आहे. विशेष म्हणजे सुटीच्या दिवशीही हे पथक काम करीत आहे. ग्रामस्थांनी या अभियानात आपल्याकडील थकीत कर भरून ग्रामविकासास हातभार लावण्याचे आवाहन ग्रामविकास अधिकारी जगदीश आढाव यांनी केले आहे.

# शहर मनपाच्या स्वच्छता निरीक्षकांची 'दाम'दार कारवाई?

## छोटे व्यावसायिक टार्गेट; मोठ्यांकडे सर्रास दुर्लक्ष

**जालना । प्रतिनिधी -** शहरात विविध ठिकाणी अवैधरित्या तसेच विना परवाना फटाका विक्री करणाऱ्यांविरोधात शहर महानगर पालिकेच्या स्वच्छता निरीक्षकांनी 'दाम'दार कारवाई केली असून केवळ हातगाडी व छोट्या व्यावसायिकांना टार्गेट केले आहे. मोठ्या व्यवसायिकांच्या नियम डावल्यांकडे सर्रास दुर्लक्ष केले असल्याने स्वच्छता निरीक्षकांना कारवाई करण्यासाठी मोठ्या व्यवसायिकांनी आर्थिक रसद पुरविली की काय असा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

अपर जिल्हादंडाधिकारी जालना यांनी शहरातील फटाके विक्री ठिकाणी आवश्यक ती उपाययोजना करणे तसेच अवैध व विनापरवानगी फटाका विक्री विरुद्ध कार्यवाही करण्याबाबत आदेश दिले होते. त्यानुसार शहर मनपाचे आयुक्त तथा प्रशासक यांनी मनपा प्रशासन व पोलीस प्रशासनाच्यावतीने अवैध व विना परवानगी फटका विक्री विरुद्ध मंगळवार (दि २९) व बुधवार (दि ३०) रोजी कारवाई केली.

या कारवाईत मुख्य बाजारपेठेतील दाना बाजार परिसरात अलिम शेख सत्तार (रा. कबाडी मोहल्ला) हातगाडीवर फटाका विक्री करतांना आढळून आला त्याच्याकडे परवानगी नसल्याने त्यांच्या ताब्यातील हातगाडीवरील विविध प्रकारचे फटाके पोलीस ठाण्यात जमा करुन त्याच्यावर मानवी जिवीतास धोका व दुखापत होईल असे कृत्य करुन विना परवानगी फटाके विक्री करण्यासाठी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच नुतनवसाहत भागात डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळ धनंजय प्रभाकर चाटे (रा. नुतन वसाहत) यास शासनाचा परवाना नसल्याने तसेच सुरक्षेबाबत काही एक उपाययोजना नसल्याने त्याच्या ताब्यातील विविध प्रकारचे फटाके ताब्यात घेऊन त्याच्यावरही कारवाई करत गुन्हा दाखल केला आहे.




ही कारवाई स्वच्छता विभाग प्रमुख पंडीत पवार, अग्निशमन विभाग प्रमुख माधव पानपट्टे, स्वच्छता निरीक्षक अशोक लोंढे, प्र. स्वच्छता निरीक्षक अरुण वानखेडे व इतर कर्मचारी यांनी केली आहे.

शहरातील कल्याणराव घोगरे स्टेडियम व आझाद मैदान येथे गेल्या दहा-पंधरा दिवसांपुर्वीपासून फटाका मार्केट उभारून तेथून फटाक्यांची विक्री होत असून या मार्केटच्या परिसरात आजुबाजुला लोकवस्ती, शाळा, दवाखाने, बाजार आहे. परिणामी ते नागरिकांच्या जीवीतास हानी पोहचू शकते, त्यामुळे या दोन्ही ठिकाणी फटाके विक्री साठी परवानगी देण्यात येऊ नये याबाबत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्यावतीने निवेदन देण्यात आले होते. विशेष म्हणजे यात स्वच्छता निरिक्षकांनी लाखो रुपयांची लाच घेतली असल्याचा गंभीर आरोप केला होता. मुळात मानवी आरोग्यास धोका असलेल्या मोठ्या व्यवसायिकांना मनपा प्रशासन तसेच स्वच्छता निरीक्षकांनी रान मोकळे करुन दिले असून केवळ छोट्या व हातगाडयांवरील व्यवसायिकांना टार्गेट केले आहे. या सर्व गंभीर प्रकाराकडे शहर मनपा आयुक्त तथा प्रशासक तसेच जिल्हाधिकारी लक्ष देतील का असा प्रश्न सर्वसामान्यांमधून उपस्थित होत आहे.

# अंजलीताई आंबेडकर यांनी वंचितचे सक्रिय कार्यकर्ते दिवंगत अनिल हिवाळे यांच्या कुटुंबियांची घेतली भेट

**जालना । प्रतिनिधी -** तालुक्यातील बोरगांव येथील वंचित बहुजन आघाडीचे सक्रिय कार्यकर्ते दिवंगत अनिल हिवाळे यांचे दिनांक १९ सप्टेंबर २०२४ रोजी अपघाती निधन झाले. अंजलीताई आंबेडकर ह्या जालना जिल्हा दौऱ्यावर दिनांक २७ आक्टोंबर २०२४ रोजी प्रबुद्ध भारत वाचक मेळाव्याच्या निमित्ताने आल्या असतांना वंचित बहुजन आघाडीचे मराठवाडा उपाध्यक्ष दिपक डोके यांनी दिवंगत अनिल हिवाळे यांची अँड.बाळासाहेब आंबेडकर यांच्या वर निष्ठा किती आढळ होती.



याविषयी अंजली ताई आंबेडकर यांना माहिती दिली की , रमाई घरकुल योजनेचा लाभ मिळवण्यासाठी २ वर्ष विलंब झाला याचे कारण वंचित बहुजन आघाडी, अँड.बाळासाहेब आंबेडकर यांचा सक्रिय कार्यकर्ता असल्यामुळे ,घरकुल नाही मिळाले तरी चालेल पण वंचित व अँड.बाळासाहेब आंबेडकर यांना कदापि सोडणार नाही अशी ठामपणे भुमिका घेणारा कार्यकर्ता म्हणजे दिवंगत अनिल हिवाळे होय. अशी आढळ निष्ठा असलेल्या दिवंगत अनिल हिवाळे त्यांच्या पश्चात पत्नी व दोन मुली व एक लहान मुलगा आहे. त्यांच्या कुटुंबीयांचे बोरगांव ता.जि.जालना येथे त्यांच्या राहत्या घरी पायऱ्यावर बसून अंजली ताई आंबेडकर यांनी कुटुंबीयांचे सांत्वन केले व आंबेडकर कुटुंबाचा किती साधेपणा आहे याचा प्रतेय दिला व पक्षाच्या वतीने त्यांच्या दोन मुलींच्या शिक्षणाची जबाबदारी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने अंजलीताईं आंबेडकर यांनी स्वीकारली व मायेचा आधार दिला.

यावेळी वंचित बहुजन आघाडी राज्य प्रवक्ता तय्यब जफर, मराठवाडा उपाध्यक्ष दिपक डोके व पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पोस्टात नोकरी करणाऱ्या ऋषीकेश चव्हाणचे वैद्यकीय पुर्व परीक्षेत यश

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** कुंभारझरी येथील ऋषीकेश रावसाहेब चव्हाण यांने वैद्यकीय पुर्व परीक्षेत घवघवीत यश संपादन करून त्याची शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात निवड झाल्याने नवभारत शिक्षण संस्थेच्यावतीने त्याच्या पालकांचा सत्कार करण्यात आला.



वैद्यकीय महाविद्यालयात एमबीबीएससाठी त्याची निवड झाली आहे. नवभारत कनिष्ठ महाविद्यालय, जेबिके विद्यालयात ऋषिकेशचे वडील रावसाहेब चव्हाण यांचा सत्कार करण्यात आला.

ग्रामीण भागात शिक्षण घेऊन व पोस्टमनची नौकरी करून कोणतेही खाजगी क्लास न लावता नीट परीक्षेत ऋषिकेशने ६२५ गुण मिळविले आहे. गडचिरोली येथील शासकीय यावेळी प्राचार्य नंदकुमार काळे, उपप्राचार्य दत्ता देशमुख, उपमुख्यद्यापक पंजाब सोळंके, प्रा. अरुण आहेर, प्रा. सुनिल बनसोडे, प्रा. कैलास जाधव, प्रा. डॉ. आनंद जाधव, कैलास भूतेकर उपस्थित होते.

# दिवाळी सणानिमित्त बाजारपेठ सजली

## टेंभुर्णी आठवडे बाजारात पणत्या, बोळके, झाडूसह विविध साहित्य विक्रीला

टेंभुर्णी । प्रतिनिधी - दिवाळीची बाजारपेठ सजली आहे. सोमवारच्या (ता. २८) टेंभुर्णी येथील आठवडे बाजारात खरेदीसाठी ग्राहकांनी मोठी गदों केली होती. पणती, बोळके, लक्ष्मीपूजनासाठी लागणारी मूर्ती, झाडू, करदोडे, बत्तासे, लाह्या यांसह फटाक्यांची मोठी दुकाने थाटली होती.

फटाक्यांच्या दरात गतवर्षीपेक्षा २० टक्के दरवाढ झाली आहे. देवीच्या मूर्ती साठ रुपयांपासून ३०० रुपयांपर्यंत उपलब्ध होत्या. विविध भागांतील शेकडो कारागिरांनी मूर्ती विक्रीसाठी आणल्या होत्या, तर दिवाळीला केल्या जाणाऱ्या पूजनासाठी अनेकांनी फडे (झाडू) विक्रीसाठी आणले होते. साठ रुपये ते ८० रुपये जोडीप्रमाणे या झाडूंची विक्री करण्यात आली. बाजारात आकर्षक रेडीमेड पणत्या विक्रीसाठी आल्या होत्या.

सावंगी येथील कारागीर रमेश राऊत यांनी सांगितले, की सद्यः स्थितीत माती उपलब्ध नसल्याने आम्हीही रेडीमेड पणत्याच विक्रीसाठी आणतो. बोळके घरी तयार करावे लागतात. वीस रुपये डझनप्रमाणे पणत्यांची विक्री होते. याशिवाय विविध डिझाइनच्या पणत्यांना जास्तीचा भाव मिळतो. दरम्यान, आठवडे बाजारात कपडे खरेदीसाठीही ग्रामस्थांनी मोठी गदों केली होती. स्वस्त आणि मस्त कपडे बाजारात मिळत असल्याची भावना दिवसेंदिवस वाढीस लागत असल्याने अनेकांनी आठवडे बाजारात कपडे घेणे पसंत केले.

दिवाळीच्या पूजेचे साहित्य खरेदी करताना गर्दी दिसून आली परंतु शेतामध्ये आलेला कापूस विकून दिवाळी साजरी करण्याचे ठरवलेले दिसते. यंदा अतिवृष्टीमुळे पिकांचे नुकसान झालेले असून सुद्धा बळीराजांनी मोठ्या खरेदीकडे पाठ फिरवलेली दिसते. सध्या दिवाळीचा हंगाम असताना बळीराजा शेतकरी अतिवृष्टीमुळे पिकांचे नुकसान झालेले आहे, आचारसंहितेचा भडगाव पुढे करून पंचनामे सुद्धा झालेली दिसून येत नाही. सध्या निवडणुकीचा हंगाम आहे आणि आचारसंहिता असल्यामुळे शेतकऱ्यांना मिळणाऱ्या मदतीकडे दुर्लक्ष होताना दिसत आहे. अनेक शेतकऱ्यांनी आमच्या वृत्त प्रतिनिधीशी बोलताना सांगितले की सरकारने आचारसंहिता लागण्याच्या अगोदर शेतकऱ्यांसाठी मदतीची घोषणा करायला हवी होती परंतु झालेली दिसून येत नाही.

# ग्राहक आयोगाच्या निर्णयाने जैस्वाल यांच्या घरी दिवाळी

**जालना । प्रतिनिधी -** विशाल जैस्वाल यांनी टि.व्ही.एस. आयक्युव एस.टी. गाडी हि रक्कम रुपये पाच हजार देवुन बुक केली होती व त्यावेळी त्यांना गाडीची किंमत रु. १,०८,५२०/ असल्याचे कोटेशन सुध्दा देण्यात आले होते. मात्र गाडी दिनांक २२-०४-२०२२ रोजी बुक करुन देखील प्रत्यक्ष गाडी बाजारात आणण्यात आली नव्हती. त्यामुळे श्री विशाल जैस्वाल यांनी अँड. महेश धन्नावत मार्फत ग्राहक आयोग, जालना येथे तक्रार दाखल केली होती, ज्यामध्ये आयोगाने प्रत्यक्षात गाडी वाजारात न आणता त्याची चुकींग करून ग्राहकांकडुन पैसे घेतले असे नमुद करण्यात आले होते. ग्राहक आयोगाने अॅड. धन्नावत यांचा युक्तीवाद ऐकुन टि.व्ही.एस. कंपनी तथा स्काय ऑटेव्हिल प्रा.लि. यांना सदरची टि.व्ही.एस. आयक्युब एस.टी. गाडी हि फक्त रु.१,०८,५२०/- मध्ये देण्याचे आदेश दिले. तथा दंड सुध्दा लावले. आयोगाच्या आदेशाप्रमाणे जैस्वाल यांना सदरची गाडी ज्याची प्रत्यक्ष अंदाजे किंमत २,१०,०००/ इतकी आहे, ती फक्त रु. १,०८,५२०/- मध्ये मिळाली, म्हणुन एका प्रकारे ग्राहक आयोगाच्या निर्णयाने दिवाळीच साजरी झाली असे श्री जैस्वाल यांनी प्रतिपादन केले.

# घनसावंगी विधानसभा निवडणुक; छाननी प्रक्रिया पूर्ण

**घनसावंगी । प्रतिनिधी -** घनसावंगी विधानसभा मतदार संघातून विधानसभा निवडणूकीसाठी आज दिनांक ३०.१०.२०२४ रोजी नामनिर्देशन पत्राची छाननी उमेदवार, उमेदवारांचे प्रतिनिधी यांचे उपस्थितीत करण्यात आली त्यामध्ये कठाळू (बापू) तुकाराम दशरथ, सचिन लक्ष्मण खरात यांचा शपथपत्र अपुर्ण असल्यामुळे आणि मनिषा राजेश टोपे यांचा पक्षाचा ए.बी. फॉर्म नसल्यामुळे अवैध ठरविण्यात आलेला आहे. सदरील छाननी प्रक्रियेसाठी श्रीमती मनिषा दांडगे, निवडणूक निर्णय अधिकारी, श्रीमती योगिता खटावकर, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी, श्री.विजय चव्हाण, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी, श्रीमती मोनाली सोनवणे, नायब तहसीलदार घनसावंगी, श्री.संतोष इथापे,



नायब तहसीलदार, घनसावंगी, श्री.कैलास आरगडे, श्री.विलास मुळक, श्री.विजय पाटील, श्री.पी.यू.आवटे, श्री.बी.एस.पवार, श्री.वाय.बी.सानप, श्री.जी.बी.हुलमूख यांनी कामकाज पाहिले.

सदरील माहिती निवडणूक निर्णय अधिकारी, १०० - घनसावंगी विधानसभा मतदार संघ यांनी दिली.

# डॉ.तुषार वाघमारे एम.डी.एस परीक्षा उत्तीर्ण

**मंठा । प्रतिनिधी -** नुकत्याच झालेल्या एम.डी.एस मास्टर ऑफ डेंटल सर्जरी परीक्षेत डॉ.तुषार वाघमारे यांनी विशेष प्राविण्यसह यश संपादन केले आहे. ही परीक्षा महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक द्वारे आयोजित केली होती.



डॉक्टर तुषार वाघमारे यांचे बि.डी.एस चे शिक्षण सी.एस.एस छत्रपती संभाजी नगर येथे पूर्ण झाले त्यांनी शालेय व महाविद्यालय शिक्षण सुद्धा विशेष प्राविण्याने पूर्ण केले आहे .त्यांच्या या यशाबद्दल सर्वज्ञ कौतुक होत आहे त्यांनी या यशाचे श्रेय त्यांचे आई वडील व शिक्षकांना दिले आहे.

# भारतीय सैनिकांसाठी दिवाळी फराळ व शुभेच्छा कार्ड भेट पाठविण्याचा संकल्प

**डोंबिवली । प्रतिनिधी -** भारतीय सैनिकांनी आजपर्यंत स्वतःच्या प्राणांची पर्वा न करता आपल्या देशाच्या सीमांचे रक्षण कले आहे आणि अखंड करत राहतील. त्यांच्या या उपकारातून कोणीही भारतीय नागरिक कधीच उतराई होऊ शकत नाही, आणि म्हणूनच, आनंदाच्या क्षणी सैनिकांची आठवण ठेवणे हे आपले राष्ट्रीय कर्तव्य बनते.या गोष्टीची जाणीव ठेवत आणि कारगिल विजयाच्या रौप्य महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून, भारत विकास परिषद, हुतात्मा कॅप्टन विनयकुमार सचान डोंबिवली शाखेने यंदाच्या वर्षी ५००० भारतीय सैनिकांसाठी दिवाळी फराळ व शुभेच्छा कार्ड भेट म्हणून पाठवण्याचा संकल्प केला होता.फराळाचे सर्व पॅकिंग भारत विकास परिषदेचे सदस्य, डोंबिवली शहरातील राष्ट्राभिमानी नागरिक, विद्यार्थी यांच्या श्रमदानातून झाले. डोंबिवली परिसरातील सुमारे ४० शाळांमधील ५५०० विद्यार्थ्यांनी सैनिकांना देण्यासाठी शुभेच्छा कार्ड बनविण्यात सहभाग घेतला. फराळाच्या प्रत्येक बॉक्स बरोबर विद्यार्थ्यांनी तयार केलेले एक शुभेच्छा कार्ड सुद्धा जवानांना पाठविण्यात आले.५००० बॉक्स सीमावर्ती भागातील सैनिकांना पाठवण्याकरता सुमारे २५लाख इतका खर्च आला आहे. लोकसहभागातून ही रक्कम उभी रहात आहे. इच्छुक व्यक्तींनी अॅड. वृंदा कुळकर्णी, अध्यक्षा- भारत विकास परिषद, कॅप्टन विनयकुमार सचान डोंबिवली शाखा, संपर्क क्रमांक- ९८२१४२९६७७ तसेच ईमेल- vj19857gmail.comयावर संपर्क साधू शकतात. मागील वर्षीही डोंबिवली शाखेने दोन हजार फराळाचे बॉक्स सीमावर्ती सैनिकांसाठी पाठवले होते.वरील प्रमाणे संकल्पपूर्ती होऊन भारताच्या उत्तरेकडील, पूर्वांचलाकडील तसेच पश्चिमेकडील भू व सागरी सीमांवरील ९ पोस्टस् वर फराळाचे बॉक्स पाठविण्यात आले आणि ते वेळेत पोहोचले आहेत. तसेच संस्थेचे काही सदस्य वेगवेगळ्या सीमा भागांवर, पूर्वपरवानगी घेऊन, सैनिकांना दीपावलीच्या शुभेच्छा देण्यासाठी प्रत्यक्ष भेट देऊन आले आहेत.



## अंजलीताई आंबेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली

# प्रबुद्ध भारत जनजागृती मेळावा



**जालना । प्रतिनिधी -** तालुक्यातील सेवली येथे अंजलीताई आंबेडकर यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली प्रबुद्ध भारत जनजागृती मेळावा आयोजित करण्यात आला होता या मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी वंचित बहुजन आघाडीचे मराठवाडा उपाध्यक्ष दिपक डोके हे होते तर प्रमुख पाहुणे राज्य प्रवक्ता तय्यब जफर, कार्याध्यक्ष प्रमेश्वर खरात, वंचित चे घनसावंगी उमेदवार बळीराम खटके,परतुरचे उमेदवार रामप्रसाद थोरात, बदनापूरचे उमेदवार सतिश खरात ,सुरज सोनोवने डॉ किशोर त्रिभुवन, रोहन वाघमारे, भारत उघडे , सुभाष जाधव,रवि भदर्गे, किशोर तुपे, अंबादास खरात, नारायण ढाकरगे, पुरुषोत्तम देशमुख आदी होते, कार्यक्रमास अपेक्षेपेक्षा जास्तीचा उदंड प्रतिसाद मिळाला हजारोच्या संख्येने महिला पुरूष उपस्थित होते या कार्यक्रमास यशस्वी करण्यासाठी सर्जेराव सदावर्ते दिलीप मगर मुकुंद काळे विकास तुरेराव, सिध्दार्थ काळेबाग, शहाजी खाडे लखन सदावर्ते , दत्ता खाडे अरुण काकडे अनिल खाडे,आदींनीसह शेकडो पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी परिश्रम घेतले .

# जालना जिल्हा विधानसभा मतदार संघाच्या पूर्वपिठीकेचे प्रकाशन

**जालना । प्रतिनिधी -** भारत निवडणूक आयोगाने विधानसभा सार्वत्रिक निवडणूक- २०२४ कार्यक्रम जाहीर केलेला आहे. त्या अनुषंगाने जालना जिल्हा प्रशासन विधानसभेची निवडणूक यशस्वीपणे पार पाडण्यासाठी तयारीला लागलेले असून त्याच अनुषंगाने माध्यम कक्षामार्फत जालना जिल्ह्यातील पाच मतदारसंघाची सन १९८० ते २०१९ पर्यंतची पूर्वपीठिका- माहिती पुस्तिका तयार करण्यात आलेली आहे. या पुस्तिकेचे प्रकाशन जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल भवनात मान्यवरांच्या हस्ते बुधवार दि.३० ऑक्टोबर २०२४ रोजी पार पडले.




यावेळी निवडणूक निरीक्षक (सामान्य) वेद पती मिश्र, निवडणूक निरीक्षक (सामान्य) श्री. नवीन, निवडणूक निरीक्षक (पोलिस) झेड नी विजया, निवडणूक निरीक्षक (खर्च) देव प्रकाश बमणावत, जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, पोलिस अधिक्षक अजयकुमार बन्सल, अपर जिल्हाधिकारी रिता मैत्रेवार, निवासी उपजिल्हाधिकारी गणेश म हाडिक, उपजिल्हा निवडणूक अधिकारी शशिकांत हदगल, बीएसएफचे अजयकुमार आणि जिल्हा माहिती अधिकारी तथा माध्यम कक्ष नोडल अधिकारी अरुण सुर्यवंशी आदी प्रमुख उपस्थित होते.

जालना जिल्हा विधानसभा मतदार संघ पूर्वपीठिका- माहिती पुस्तिकेचे कौतुक करत ही पुस्तिका सर्व प्रसार माध्यमे, अभ्यासकांसाठी नक्कीच उपयुक्त ठरणार असल्याचे सुतोवाच मान्यवरांनी काढले. पूर्वपिठीकेमध्ये निवडणूक आचारसंहिता, पेड न्यूजचे निकष, सोशल मिडिया, इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र, महाराष्ट्र राज्य निवडणूक कार्यक्रम, विधानसभा मतदार संघ निवडणूक कार्यक्रम, निवडणूक निरिक्षक, भारत निवडणूक आयोग, मुख्य निवडणूक अधिकारी, जालना जिल्ह्यातील जिल्हास्तरीय विभागप्रमुख, सर्व विधानसभा मतदार संघातील प्रमुख संपर्क अधिकारी, कक्ष प्रमुख, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांचे दूरध्वनी क्रमांक तसेच मतदार संख्या, मतदान केंद्र, ईव्हीएम/ व्हिव्हिपॅट आणि सन १९८० ते सन २०१९ पर्यंत जालना जिल्ह्यातील विधानसभा म तदार संघात पार पडलेल्या निवडणूकांची सविस्तर माहिती संकलीत करण्यात आलेली आहे. या पूर्वपिठीकेसाठी एम.ई. तुपसमिंद्रे, प्रा. सुनिल इंदूरकर, श्री. बदनापूरकर, पुष्पा धनाईत, प्रतिभा इंगळे यांच्यासह आदींनी सहकार्य केले.

# फोर्टीफाईड तांदुळ आरोग्यासाठी अत्यंत लाभदायी - सविता चौधर

**जालना । प्रतिनिधी -** सध्या स्वस्त दुकानातील तांदळात प्लॅस्टिकचे तांदुळ मिळत असल्याच्या अपप्रचार सुरु असल्याचे जिल्हा प्रशासनाच्या निदर्शनास आले आहे. मात्र रेशनिंग दुकानातुन मिळणारा तांदुळ हा फोर्टीफाईड तांदुळ आहे. केंद्र शासनाच्या अन्नसुरक्षा योजनेअंतर्गत हा तांदुळ वितरीत केला जात असून, तो आरोग्यासाठी अपायकारक नसून अत्यंत लाभदायी आहे, असा खुलासा अन्नधान्य वितरण अधिकारी कार्यालयाकडून करण्यात आला. अशी माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी सविता चौधर यांनी दिली आहे.

स्वस्त दुकानातून घरी आणलेला तांदुळ पाण्यावर तरंगत असल्याने तो प्लॅस्टिकचा आहे. अशी चर्चा ग्राहकांमध्ये सुरु आहे. ग्राहकांमध्ये असलेला हा गैरसमज दूर करण्यासाठी जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालयाने स्पष्टीकरण देत फोर्टीफाईड तांदळाचे महत्त्व सांगितले की, हा तांदुळ अधिक पौष्टिक असून शरिरास आवश्यक पोषण तत्वांची पुर्तता हा फोर्टीफाईड तांदुळ करतो. शरीरात पोषक तत्वांचे घटक कमी असतील तर फोर्टीफाईड तांदुळ खाल्ल्याने पोषण तत्वांची कमतरता दुर करण्यास मदत मिळेल. फोर्टीफाईड तांदळामध्ये यॅलेसेमिया, सिकलसेल, ॲनिमिया असे आजार रोखण्याचे गुणधर्म आहेत. फोर्टीफाईड तांदळामध्ये लोह, फॉलिक ॲसिड, व्हिटॅमिन बी-१२ चे सूक्ष्म अन्नद्रव्य असून आरोग्याच्या दृष्टीने उत्तम असा आहे. असेही जिल्हा पुरवठा अधिकारी श्रीमती चौधर यांनी सांगितले आहे.

वजनाला हलका असल्याने हा तांदुळ पाण्यावर तरंगत असतो. फोर्टीफाईड तांदळाबाबत लाभार्थ्यास शंका असल्यास त्यांनी जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालयास संपर्क साधावा. फोर्टीफाईड तांदुळ हा तांदळाच्या पिठापासुन बनलेले असतात. ज्यात आरोग्यासाठी आवश्यक सुक्ष्म पोषक घटक असतात. बी-१२ सुक्ष्म अन्नद्रव्य मिश्रण केले जाते. या मिश्रणाला पुन्हा तांदळाचा आकार दिला जातो. यालाच फोर्टीफाईड तांदुळ म्हणतात. लाभार्थ्यांनी फोर्टीफाईड तांदळाबाबत होत असलेला अपप्रचार, अफवा व खोट्या बातम्यावर विश्वास ठेवू येऊ नये, असेही प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.